संशोधन विषय

“भारताचे परराष्ट्र धोरण : पं. जवाहरलाल नेहरु आणि इंदिरा गांधी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव्य विदयाशाखे अंतर्गत राज्यशास्त्र या विषयात विदयावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

राऊलवाड गंगाधर गंगाधर

एम.ए.नेट.(राज्यशास्त्र)

गोकुळ नगर, रत्नाळी

ता. धर्माबाद जि. नांदेड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. डोंगरे एल. बी.

एम. ए. नेट. पीएच. डी. (राज्यशास्त्र)

सहयोगी प्राध्यापक

विभाग प्रमुख राज्यशास्त्र

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविदयालय हिमायतनगर, जि. नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

२०२२

“भारताचे परराष्ट्र धोरण : पं. जवाहरलाल नेहरु आणि इंदिरा गांधी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास”

प्रस्तावना :

परराष्ट्र धोरणाचा उदय व विकास अलिकडील काळात घडून आला असला तरी व्यक्ती संबंधाच्या इतकाच राज्याच्या संबंधाचा जुना इतिहास आहे. सुप्रसिध्द ग्रीक तत्वज्ञ ॲरिस्टोंटल यांनी म्हटल्याप्रमाणे मनुष्य हा सामाजिक व राजकीय प्राणी आहे. तत्वत: राष्ट्रे देखील एकाकी राहु शकत नाही. मध्ययुगीन विचारवंत मॅकियाव्हलीच्या, द प्रिन्स या ग्रंथात तसेच कौटिल्याव्या, अर्थशास्त्र या ग्रंथातील मंडल सिध्दांतात मित्र आणि शत्रु राष्ट्र बरोबरच शेजारील राष्ट्रांशी संबंधाबाबत उल्लेख आढळतो. याशिवाय महाभारतातील शांतीपर्व आणि अन्य ग्रंथात अशी अनेक उदाहरणे आढळतात ज्यावरुन स्पष्ट होते की, प्राचीन काळात भारतीय विद्वानांनी आणि राज्यकर्त्या व्यक्तीनी परराष्ट्र संबंध आणि राजनय याला महत्व दिले आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खऱ्या अर्थाने भारताच्या परराष्ट्र धोरणाची सुरुवात झाली असली तरी, जागतिक पातळीवर भारताची मोठी परंपरा राहिली आहे. या बाबतीत मार्च १९५० मध्ये पं. जवाहरलाल नेहरुं लोकसभेत भाषण देतांना स्पष्ट केले होते की, भारत हा परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत अगदी नवखा आहे असे समजणे चुक आहे. या धोरणाचा संबंध आमच्या प्राचिन इतिहास आणि राष्ट्रीय आंदोलनाशी संबंधित आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणातील मुलभूत तत्वांचा समावेश भारतीय संविधानाच्या भाग ४ मधील कलम ५१ मध्ये करण्यात आला आहे. ज्या नुसार भारत आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता आणि सुरक्षिततेला प्राधान्य देईल, राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये न्याय आणि सन्मानपुर्वक संबंध स्थापित

करण्याचा प्रयत्न करेल तसेच आंतरराष्ट्रीय कायदयाचे पालन करुन विवादात्मक प्रश्नांची शांततामय मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न करील.

आधुनिक भारताच्या परराष्ट्र धोरणाला ब्रिटिश कालखंडातच निश्चित आकार प्राप्त झाला. भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या विकासास भ. गौतम बुध्द आणि भ. महाविरांच्या विचारांना व्यावहारीकतेची जोड तसेच भारतीय संस्कृती, मुल्ये आणि नैतिकतेचाही फार मोठा वाटा आहे. त्याचबरोबर म. गांधजींच्या अहिंसावादी विचारसरणीने, अरबिंदो आणि रविंद्रनाथ टागोर यांचा अध्यात्मवाद आणि आंतरराष्ट्रीयवादाने प्रभावित केले. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या जडण-घडणीमध्ये पं. जवाहरलाल नेहरु आणि राष्ट्रीय कॉग्रेसचे योगदान महत्वपुर्ण आहे. ऐतिहासीक परंपरा, भौगोलीक परिस्थीती आणि भुतकाळातील अनुभव भारतीय विदेश नितीच्या निर्धारणात प्रभावी तत्व ठरले आहेत. कालसापेक्ष गतिशीलता हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा स्थायीभाव राहिला आहे. १९४६ च्या हंगामी सरकारच्या स्थापनेनंतर पं. नेहरुंनी असे स्पष्ट केले की, “स्वतंत्र भारत आंतरराष्ट्रीय क्षेत्रात एक स्वतंत्र धोरण अवलंबविण्याचा प्रयत्न करेल.” तो कोणत्याच गटात सामिल होणार नाही. भारत जगात कोणत्याही भागात साम्राज्यवाद, वसाहतवाद, वंशभेद, वर्णभेद यांचा विरोध करेल. तसेच जागतीक शांततेसाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व राष्ट्रांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करेल.

भारताने नेहमी जागतीक पातळीवर शांतता आणि सहकार्य या वत्वांचा पुरस्कार करुन शेजारील राष्ट्रांसोबत मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र जगातील बडया राष्ट्रांच्या दुटप्पी धोरणाबरोबरच शेजारील राष्ट्रे भारताच्या या धोरणाकडे सातत्याने अविश्र्वासाच्या नजरेने पाहतात. भारत-पाकिस्तानचा इतिहास व संस्कृती जवळपास

सारखी असताना देखील गेल्या ७५ वर्षाच्या काळात त्यांच्यात समाधानकारक मैत्री होऊ शकली नाही. ही अंत्यत खेदाची बाब आहे.

संशोधन विषय निवडीचे महत्व

आधुनिक काळात कोणतेही राष्ट्र पुर्णपणे स्वावलंबी राहु शकत नाही. परराष्ट्राशी आर्थिक व राजकिय संबंध ठेवणे सर्व राष्ट्रांसाठी अपरिहार्य झाल्यामुळे परराष्ट्र धोरणाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात नेहमी मैत्रीपुर्ण संबंध, विश्वशांती सहकार्य आणि समानता अशा सिध्दांतांना सर्वाधिक महत्व दिला गेला. पं. जवाहरलाल नेहरु यांना भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार असे म्हटले जाते. ते फक्त स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान आणि १७ वर्षे परराष्ट्रमंत्री होते, तर ते त्याच्यापुर्वी २५ वर्षापासुन अखिल भारतीय काँग्रेसचे परराष्ट्र व्यवहाराचे प्रवक्ता सुध्दा होते. भारताच्या परराष्ट्र धोरणाला पाश्चिमात्य लोक नेहरुंचे परराष्ट्र धोरण (Nahru's Foreigh Policy) म्हणतात त्यांनी १९५४ मध्ये मांडलेले पंचशील तत्व हे जागतीक शांततेसाठी मोलाचे मार्गदर्शक ठरते. आणि त्यांची अलिप्ततावादी निती व स्व:निर्णय तसेच राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे प्रतिक आहे. पण आक्टो. १९६२ मध्ये चीनचे भारतावरील आक्रमणामुळे पंचशील तत्वांच्या मोहनिद्रामध्ये असलेल्या भारताला पराभवाचा धक्का बसला. पं. नेहरुनंतरच्या लाल बहादुर शास्त्री यांचा दोन वर्षाच्या नेतृत्वानंतर इंदिरा गांधी यांचे १९६६ ते १९७७ व१९८० ते १९८४ अशा दोन टप्प्यांमध्ये एकुन १५ वर्षे भारताला खंभीर नेतृत्व लाभले. त्यांच्या पंतप्रधान पदातील परराष्ट्र धोरणाचे नेतृत्व हे संशोधनाचा विषय आहे.

भारताला लाभलेल्या पं. जवाहरलाल नेहरु आणि इंदिरा गांधी या अशा महान नेतृत्वाच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक संशोधन होणे महत्वाचे आहे. त्यांच्या कालकिर्दीतील आदर्शवाद, वास्तववाद, अण्वस्त्र निम्रिती विषयक धोरण, जागतीक महासता आणि शेजारील राष्ट्राविषयीचे परराष्ट्र धोरणतील फरक तसेच त्यांच्या कालखंडातील भारताच्या अंतर्गत परिस्थितीचा आणि राजकीय व्यवस्थेबरोबरच जागतीक लोकमताचा परराष्ट्र धोरणावर पडलेला प्रभाव यांचे तुलनात्मक अभ्यास करुन त्याचा भारताच्या पुढील कालखंडाच्या परराष्ट्र धोरणास मार्गदर्शक ठरलेल्या घटकांचा अभ्यास करुन त्यावर निष्कर्षनात्मक संशोधन करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

समस्यासूत्रण

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताचे परराष्ट्र धोरण हे प्रामुख्याने पं. नेहरुंच्या आदर्शवादाने प्रभावित होते. परराष्ट्र धोरण केवळ राष्ट्रीय हित साध्य करण्याचे साधन नसुन देशांतर्गत विकास घडवुन आणण्याबरोबरच जागतीक शांतता आणि सुरक्षिततेसाठी परराष्ट्र धोरणाचा वापर केला पाहिजे असे पं. नंहरुंचे मत होते. त्यांचा अलिप्ततावाद आणि पंचशील तत्वावर विश्वास होता. त्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयीचे ज्ञान पाहुन सन १९४२ मध्ये म. गांधी म्हणाले की, “In Inter national Affaier’s Neharu is my Guru” असे असताना देखील भारताला वेळोवेळी शेजारील राष्ट्रांशी युध्दाचा सामना करावा लागला. पं. नेहरु आणि इंदिरा गांधी अशा मातब्बर नेत्यांचे नेतृत्व भारताला लाभलेले असतानाही आपण शेजारील राष्ट्रांशी विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यात का अपयशी पडलो? हा संशोधनाचा विषय आहे. पं. नेहरुंसारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे

व्यक्तीमत्वाच्या पंतप्रधानाच्या कालखंडात चीनचे आक्रमण आणि पराभवाला सामोरे जावे लागले. शास्त्रीजी पेक्षा इंदिराजींच्या काळातील भारताचे पराराष्ट्र धोरण अधिक वास्तववादी होत आणि पं. नेहरु पेक्षा ते पुर्णत: वेगळे होते. पं. नेहरु आणि इंदिरा गांधी यांच्या काळातील भारतीय परराष्ट्र धोरणाच्या तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी संशोधकांचे म्हणावे तसे लक्ष गेलेले नाही. त्यांच्या कालखंडातील आदर्शवाद, अलिप्ततावाद, अण्वस्त्र धोरण, सांप्रदायिकतावाद, सीमावाद शेजारील राष्ट्रांशी संबंध आणि भारतीय परराष्ट्र धोरणातील विविध घटना- घडामोंडीचा तुलनात्मक अभ्यास करुन त्यांच्या परराष्ट्र धोरणाचा भारताच्या अलिकडील परराष्ट्र धोरणातील समस्या निवारणात कोणते घटक साहयभुत ठरले याचा संशोधनात्मक अभ्यास होणे महत्वाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.
२. भारताच्या परराष्ट्र धोरणाची वैचारिक पाश्वभूमी आभ्यासणे.
३. भारताच्या परराष्ट्र धोरणावर नेहरुंच्या विचारांचा प्रभाव अभ्यासणे..
४. पं. जवाहरलाल नेहरु यांच्या काळातील परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.
५. इंदिरा गांधी यांच्या कालखंडातील परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.
६. पं. जवाहरलाल नेहरु आणि इंदिरा गांधी यांच्या परराष्ट्र धोरणातील साम्य आणि भेद याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके

१. भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल आदर्शवादाकडून वास्तववादाकडे झाल्याचे दिसून येते.

२. भारताच्या परराष्ट्र धोरणावर पंचशील तत्वाचा प्रभाव दिसून येतो.

३. भारताचा परराष्ट्र धोरणावर नेहरुंच्या विचारांच प्रभाव दिसून येतो.

४. जवाहरलाल नेहरुंच्या काळात जागतीक पातळीवर प्रभाव निर्माण करुन शेजारील राष्ट्रासोबत संबंध सुधारण्यात यश आल्याचे दिसून येते.

५. इं. गांधीचे परराष्ट्र धोरण हे वास्तववादावर भर दिल्याचे दिसून येते

६. पं. जवाहरलाल नेहरु यांचे परराष्ट्र धोरण आदर्शवादी होते तर इं. गांधी यांचे परराष्ट्र धोरण वास्तववादाशी संबंधित होते.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संशोधकाला अचुक निष्कर्षासाठी विषय निवडी बरोबरच त्यांच्या मर्यादा निश्चित कराव्या लागतात. भारत स्वातंत्र्यापासुन ते आजपर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणावर अनेक व्यक्तीचा मोलाचा सहभाग राहीला आहे. परंतु अशा सर्व नेत्यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास एका प्रबंधात करणे शक्य नाही परराष्ट्र धोरणाची व्याप्ती खुप मोठी आहे. वस्तुनिष्ठ संशोधनासाठी संशोधक पं. जवाहरलाल नेहरु आणि इंदिरा गांधी यांच्या भारतीय परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास, त्यांच्या परराष्ट्र धोरणातील यश-अपयश तसेच त्यांच्या काळातील परराष्ट्र धोरण निर्धारणातील अंतर्गत आणि बाहय अडथळे यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे. हि संशोधनाची मर्यादा आहे. प्रस्तुत विषयाच्या संशोधनाची व्याप्ती पं. जवाहरलाल नेहरु आणि इंदिरा गांधी यांच्या कालखंडापुरती सिमीत असुन पं. जवाहरलाल नेहरु यांचा १९४७ ते १९६४ आणि इंदिरा गांधी यांचा १९६६ ते १९७७ व १९८० ते १९८४ पर्यंतचा कालखंड निश्चित करण्यात आला.

संशोधन पद्धती

संशोधन करताना संशोधकास विशिष्ट पध्दतीचा वापर करावा लागतो. यामुळे संशोधकास वेळ, पैसा आणि श्रम याची बचत होवून निष्कर्ष काढणे सोपे जाते. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात येइल. संशोधकाला विषयाची निवड करुन त्या अनुषंगाने उदिष्ट मांडावे लागतात. पूर्व ज्ञानाच्या अधारे गृहित निश्चित केले जातात. तथ्त संकलनासाठी ग्रंथ, पुस्तके, मासिके, नियतकालिके, शासकीय प्रकाशित, अप्रकाशित दस्ताऐवज या दुय्यम साधनांच्या आधारे वस्तुनिष्ठ संशोधन करुन निष्कर्ष मांडले जातील.

प्रकरणाची रुपरेषा/आराखडा

प्रकरण पहिले : प्रस्तावना

यामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणाचे ऐतिहासिक पार्श्वभूमी, परराष्ट्र धोरणाचा उदय, विकास व स्वरुप यांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे : संशोधन पध्दती

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाची उदीष्टे, महत्व, गृहितके, व्याप्ती, मर्यादा, तथ्य संकलन, संशोधन साहित्याचा आढावा इ. बांबीचा विस्ताराने आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे : पं. जवाहरलाल नेहरु यांचे परराष्ट्र धोरण

सदरील प्रकरणात पं. जवाहरलाल नेहरु यांच्या कालखंडातील (१९४७ ते १९६४) परराष्ट्र धोरणाचा सविस्तर आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे : इं. गांधी यांचे परराष्ट्र धोरण

सदरील प्रकरणात इं. गांधी याच्या कालखंडातील (१९६६ ते १९७७ व १९८० ते १९८४) परराष्ट्र धोरणाचा सविस्तर आढावा घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे : पं. जवाहरलाल नेहरु आणि इं. गांधी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास

सदरिल प्रकरणात पं. जवाहरलाल नेहरु आणि इं. गांधी यांच्या परराष्ट्र धोरणातील साम्य आणि भेद तसेच तुलनात्मक अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण सहावे

निष्कर्ष

एकूण संशोधनाशी संबंधीत वस्तूनिष्ठपणे निष्कर्ष मांडण्यात येतील.

संदर्भग्रंथ

१. डॉ. बी. एस. कुऱ्हाडे - सामाजिक संशोधन पध्दती, पिपळापुर ॲण्ड कं. पब्लीशर्स, नागपूर.

२. डॉ शैलेंद्र देवळाणकर - भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे ३०,२००७.

३. डॉ शांताराम भोसले - भारताचे परराष्ट्र धोरण, विदया प्रकाशन, नागपुर १९९२.

४. डॉ भास्कर लक्ष्मण भोळे - पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, पिपंळापुर अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.

५. डॉ. बी. एल. फाडिया - प्रतियोगिता साहित्य सिरिज, आग्रा.

६. बि.स. वाळिबे - रायबरेली आणि त्यानंतर, श्री विदया प्रकाशन, शनिवारपेठ ३०.१९७८

७. अरुण पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुध्दे - आंतरराष्ट्रीय संबंध शितयुध्दोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिएंट ब्लॅकस्वान प्रा. लि. मुंबई. २००८.

८. डॉ. ज. रा. शिन्दे – भारताचे परराष्ट्रीय धोरण, कैलाश पाब्लिकेशन औरंगपुरा, औरंगाबाद, 1992.

९. प्रा. वराडकर – आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकरण, विध्या प्रकाशन, नागपुर.

१०. सुधिर बोधनकर – सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ पब्लिशर्स, नागपुर.

संशोधक

राऊलवाड गंगाधर गंगाधर
राज्यशास्त्र, एम. ए. नेट
रा. रत्नाळी ता. धर्माबाद
जि. नांदेड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. डोंगरे एल. बी.
सहयोगी प्राध्यापक
विभाग प्रमुख राज्यशास्त्र
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविदयालय,
हिमायतनर, जि. नांदेड